## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे ऑक्टोबर २०१८

## १) गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक(अभि.), गु.अ.वि; मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | गु.र.क्र व कलम | गुप्रशा; गुरक्र. ६३/२०१८ कलम ३०२, २०१ सह १२०(ब) भादंवि. सह कलम ३,२५,२७ भा.ह.का. सह कलम ३७ (१), १३५ मपोका. (दादर पोलीस ठाणे गुरक्र.२३२/२०१८) |
| २ | गुन्हा घडला दिनांक | दिनांक १२/१०/२०१८ रोजी ०७.०० वा. चे सुमारास |
| ३ | गुन्हयाचे ठिकाण | म्हात्रे पेन कंपनी सोसायटी समोर रस्त्यावर उत्तर वाहिणी, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई |
| ४ | फिर्यादी | श्री. संजय कुमार पुल्लूराम मौर्य, वय – ४३ वर्षे |
| ५ | मयत | मनोजकुमार पुल्लुराम मौर्य वय ३७ वर्षे |
| ६ | गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता | --- |
| ७ | हस्तगत हत्यार | देशी बनावटीचे पिस्टल व कट्टा अशी दोन अग्निशत्रे व दहा काडतुसे |
| ८ | आरोपी अटक | १) राधाकृष्ण मुंद्रीका कुशवाह वय ३७ वर्षे,<br>२) राजेंद्र अमरसिंग अहेरवार वय ३० वर्षे,<br>३) हेमेंद्र ब्रिसभान कुशवाह, वय १९ वर्षे,<br>**अटक दिनांक १५/१०/२०१८ रोजी**<br>४) पुरुषोत्तम सुखनंदन सक्सेना उर्फ मल्लू वय ३८ वर्षे,<br>**अटक दिनांक २३/१०/२०१८ रोजी** |

गुप्रशा; गुरक्र. ६३/२०१८ कलम ३०२, २०१ सह १२०(ब) भादंवि. सह कलम ३,२५,२७ भा.ह.का. सह कलम ३७ (१), १३५ मपोका. (दादर पोलीस ठाणे गुरक्र.२३२/२०१८) या गुन्हयात दिनांक १२/१०/२०१८ रोजी ०७.०० वा. चे सुमारास म्हात्रे पेन कंपनी सोसायटी समोर रस्त्यावर उत्तर वाहिणी, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई याठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने अग्नीशस्त्राचा वापर करून इसम नामे मनोजकुमार पुल्लुराम मौर्य वय ३७ वर्षे याचा खुन केला. तसेच मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे प्रतिबंधक आदेशाचे उल्लंघन करून शस्त्र बाळगले म्हणुन मयताचे भावाने महिलेने दादर पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरून दादर पोलीस ठाणे गुरक्र.२३२/२०१८ अन्वये अज्ञात इसमाविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, मुंबई चे पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हयाचा तपास सुरू केला. सदर पथकाने घटनास्थळाचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले. घटनास्थळ व आजुबाजुच्या परीसरात कोणत्याही आस्थापानाचे परीसरात सिसिटिव्ही कॅमेरे आढळुन आले नाहीत. तसेच शासकिय सिसिटिव्ही कॅमेऱ्याबाबत शोध घेता, नमुद घटनास्थळ हे सीसीटिव्हीच्या परिघामध्ये येत नसल्याचे आढळुन आले.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन वरिष्ठांकडुन गुन्हयातील अज्ञात मारेकरी आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथकाचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी गुन्हयाची त्वरीत उकल करण्यासाठी वेगवेगळे पथक तयार केली व सर्व पथकाला कामे वाटुन दिली. नमूद खुनाचा गुन्हा हा दादर फूल बाजार सारख्या गजबजलेल्या ठिकाणी पहाटेच्या सुमारास अग्निशस्त्राचा वापर करुन केलेला होता. त्यामुळे सदर घटनेबाबत सर्व इलेक्ट्रॉनिक्स व प्रिंट मिडीयामध्ये मोठया प्रमाणात बातम्या प्रसिध्द झाल्या.

सदर पथकाने मयत इसमाबाबत माहिती प्राप्त करता, नमुद मयत इसम हा दादर मार्केट मध्ये इलेक्ट्रॉनिक्स वजन काटा दुरुस्तीचे व विक्रीचे काम करीत असल्याची माहिती मिळाली. यावरून सदर पथकाने त्याचे व्यवसायाशी सबंधीत त्याच्या ओळखीचे २० ते २५ व्यावसायीकांकडे चौकशी केली. सदरवेळी सर्व संबंधितांनी सांगीतले की, मयत इसम अत्यंत मितभाषी व सुशील स्वभावाचा असल्याने त्याचे कोणाशीही वैमनस्य नव्हते. मयत इसमाच्या घरी अत्यंत शोकाकुल वातावरण असल्याने त्याचे आई–वडील, बहिण, भाऊ व पत्नी यांचेकडे सदर पथकास सखोल चौकशी करता आली नाही. सदर पथकाने मयताचे इतर नातेवाईकांकडे केलेल्या चौकशीमधून गुन्हा उघडकीस येणाच्या दृष्टीने कोणतीही उपयुक्त माहिती उपलब्ध झाली नाही. सदर पथकाने मयताचे मोबाईल हॅडसेटची तपासणी व मोबाईल नंबरच्या सीडीआर चे अत्यंत काळजीपुर्वक अवलोकन केले परंतू त्यामध्ये सुध्दा काही उपयुक्त माहिती मिळून आली नाही

सदर पथकाने नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने अधिक खात्रीलायक माहिती प्राप्त व्हावी याकरीता एक पथक मयताच्या अंत्यविधी कार्यक्रमात गुप्तपणे समाविष्ट केले. सदरवेळी नातेवाईकांमध्ये दबकत चाललेल्या चर्चेतून अंदाजे तीन वर्षापूर्वी मयत व त्याची पत्नी हे दिल्ली येथे नोकरीकरीता गेले होते व तेथे मयताची पत्नी, दिल्ली येथे ज्या व्यक्तीकडे नोकरीस होती, त्या व्यक्ती सोबत काहीतरी बिनसले असल्याची माहिती प्राप्त झाली. या माहितीच्या आधारावर सदर पथकाने सर्व प्रथम घटनास्थळ व आजुबाजूचा परिसराचा, विविध मोबाईल सर्व्हीस प्रोव्हाईडरचा टॉवर ड्म्प डाटा प्राप्त केला. नमुद डम्प डाटा द्वारे दोन ते अडिच तासांमध्येच प्राप्त लाखो मोबाईल नंबर मधून त्या विभागात घटनेच्या वेळी पहिल्यांदाच वापरलेले परराज्यातील मोबाईल क्रमांक निश्चित केले.

सदर पथकाने ड्म्प डाटामधून निश्चित केलेल्या मोबाईल क्रमांकाचा सीडीआर प्राप्त केला असता, नमुद मोबाईल धारक दिल्ली येथील एका व्यक्तीच्या सातत्याने संपर्कात असल्याचे दिसुन आले. त्याबाबत सदर पथकाने मयताची बहिणीस विश्वासात घेवून तिचेकडे गोपनिय सखोल चौकशी केली असता, तिने दिलेल्या माहितीवरून दिल्ली येथे वाद झालेला इसम व डम्प डाटा मध्ये निश्चित केलेल्या व्यक्तींच्या संपर्कात असलेला इसम हा एकच असल्याचे स्पष्ट झाले.

सदर पथकाने नमुद तांत्रिक तपासाबाबत वरिष्ठांना माहिती देवून त्यांच्या परवानगीने तात्काळ एक पथक विमानाने दिल्ली येथे रवाना केले. सदर पथकाने प्रथम दिल्ली येथील संशयीत व्यक्तीचे घर, ऑफिस निश्चित केले व त्यावर गुप्त निगराणी ठेवली. सदर पथकाने नमुद संशयीत व्यक्ती मध्यरात्री त्याचे राहते घरी आल्याची खात्री करून त्यास मध्यरात्री शिताफीने ताब्यात घेतले. सदर पथकाने ताब्यातील इसम नामे राधाकृष्ण मुंद्रीका कुशवाह याचेकडे कौशल्यपुर्ण सखोल चौकशी करता, तोच गुन्हयाचा मुख्य सुत्रधार असल्याचे व त्यानेच सुपारी देवून मारेकरी पाठविल्याचे स्पष्ट झाले. त्याचे मार्फतीने मारेकरींना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता दोन्ही मारेकऱ्यांचे मोबाईल फोन बंद आढळले. यावरून सदर पथकाने मुख्य सुत्रधार आरोपी मार्फत मारेकऱ्याच्या भावास संपर्क साधून त्याच्या मार्फतीने आरोपीचा दुसरा मोबाईल क्रमांक प्राप्त केला. त्याद्वारे आरोपींशी संपर्क साधून त्यांना सुपारीची रक्कम घेण्याच्या बहाण्याने सुरजमहल मेट्रो स्टेशनखाली बोलाविले. सदर पथकाने नमुद ठिकाणी साध्या वेशात गुप्त सापळा रचला. नमुद आरोपीतांना पहाटेची वेळ देवूनही आरोपी ठरलेल्या ठिकाणी सकाळी १०.०० वा पर्यत आले नाहीत. सदर पथक हे सातत्याने ४८ तास न थकता आरोपींचा मागावर होते. अंदाजे ११.०० वा चे सुमारास मारेकरी आरोपी मुख्य आरोपी राधाकृष्ण यास मोबाईलवर कॉल आला व नमुद दोनही मारेकरी आरोपी हे मेट्रो स्टेशनवरुन उतरुन खाली येत असल्याचे त्यांनी सांगितले. साधारणतः पाच मिनिटात दोन मारेकरी मेट्रो स्टेशनवरून उतरत असतानाच, पथकाने त्यांना झडप घालून शिताफीने ताब्यात घेतले.

सदर पथकाने ताब्यातील आरोपींकडे नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने कसुन सखोल चौकशी करता, आ. क्र.१) राधाकृष्ण मुंद्रीका कुशवाह वय ३७ वर्षे याचे मयत इसमाची पत्नी दिल्ली येथे त्याच्या कंपनीत कामास असताना, तिचे सोबत एकतर्फी प्रेम होते. त्याबाबत मयतासोबत त्याचा वाद झाला होता व मयत इसम त्याचे पत्नीसह परत मुंबईत आला. त्यामुळे मयत इसम हा त्याचे प्रेमात अडसर आहे व त्याला संपविल्याशिवाय त्याची

पत्नी पुर्णत: आपली होवू शकत नाही, असे त्याचा ग्रह झाल्याने त्याने त्याचे आ.क्र.२) राजेंद्र अमरसिंग अहेरवार वय ३० वर्षे व ३) हेमेंद्र ब्रिसभान कुशवाह वय १९ वर्षे, दोघेही रा. ठि. उत्तर प्रदेश यांना रू. ५०,०००/– ची सुपारी दिली. आरोपी नामे राजेंद्र याने त्याचे राहते गावी उरई, जिल्हा–जालौन, राज्य–उत्तरप्रदेश येथे जावून एक गावठी कट्टा व दोन काडतूसे विकत आणली. त्यांना घटनेच्या सहा महिन्यांपूर्वी मुख्य आरोपीने मारेकरींना दादर पसिरात आणून मयताचे घर, त्याच्या येण्या जाण्याची वेळ इत्यादीची माहिती दिली व त्याच्यावर काही दिवस पाळत सुध्दा ठेवली. नमुद गुन्हयातील वर नमुद तिनही आरोपीतांचा सक्रीय सहभाग निषन्न झालेवरून त्यांना नमुद गुन्हयात दिनांक १५/१०/२०१८ रोजी दिल्ली येथून अटक केली. तसेच सदर पथकाने मारेकरी यांना गावठी कट्टा व काडतूस विकणारा आक्र.४) पुरुषोत्तम सुखनंदन सक्सेना ऊर्फ मल्लू वय ३८ वर्षे यास उरई, जिल्हा–जालौन, राज्य–उत्तरप्रदेश येथून अटक केली व त्याचेकडून देशी बनावटीचे पिस्टल व कट्टा अशी दोन अग्निशत्रे व दहा काडतुसे हस्तगत केली.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, मुंबई चे पथकाने मानवी कौशल्य व तांत्रिक तपासाच्या आधारे अंत्यत सातत्यपुर्ण तपासाच्या आधारे मुंबईतील दादर सारख्या गजबजलेल्या परीसरात अग्नीशस्त्राद्वारे निर्घुण हत्या करणाऱ्या आरोपीतांना गुन्हयातील वापरलेल्या हत्यारासह परराज्यातुन ताब्यात घेवून अटक केले व मारेकऱ्यांना अग्नीशस्त्र पुरविणाऱ्या आरोपीतासही अन्य अग्नीशस्त्र व काडतुसांसह नमुद गुन्हयात अटक करून सदर खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना ऑक्टोबर–२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक (अभियान), मुंबई पथकातील अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे | अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे |
|---|---|---|---|
| ०१ | प्रपोनि विनय बाबुराव घोरपडे. | ०९ | पोहक्र २६०९७/साहेबराव बाबुराव पवार |
| ०२ | पोनि सुधाकर दत्तु देशमुख | १० | पोहक्र १२४७/विश्वास शंकर मोहिते. |
| ०३ | सपोनि विक्रम विलास चव्हाण | ११ | पोनाक्र ९७०६०२/विलास वसंतराव शिंदे |
| ०४ | सपोनि प्रकाश कृष्णा होवाळ. | १२ | पोनाक्र ९७००४१/सुधिर आत्माराम कांबळे |
| ०५ | सपोनि रियाझुद्दीन हिसामुद्दीन काझी. | १३ | पोनाक्र ९९०३६१/अशरफ सुभान तडवी. |
| ०६ | सपोनि नितीन बबन लोंढे. | १४ | पोशिक्र ०१९०४/युवराज भगवान शेलार |
| ०७ | सपोनि जगदीश नवनाथ राऊत | १५ | पोशिक्र ०८०४२२/पंकज भास्कर भोसले |
| ०८ | पोउनि रघुवीर त्रंबक पाटील | १६ | मपोशिक्र०५०३३३/माधुरी गोरक्षनाथ पावसे |

—— ००० ——

**२) बांगुर नगर पोलीस ठाणे, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | बांगुर नगर पोलीस ठाणे गु.र.क्र. ३३५/१८, कलम ३०२, २०१ भा.द.वि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १५/१०/२०१८ रोजीचे १५.४४ वा.चे पुर्वी |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | स्प्रिंग हाईट बिल्डींग समोर, उत्तर वाहिणी रस्त्याच्या कडेला बॅक रोड, माईड स्पेस, मालाड पश्चिम, मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | श्री. गणेश दिलीप गोसावी वय ३० वर्षे, धंदा – नोकरी ( पो.शि.क्र. ०९–१६९१) रा.ठि. खो.क्र. ५०३/५०४ बिल्डींग नंबर ५ बी न्यू म्हाडा पोलीस वसाहत, मजासवाडी, PMGP कॉलनी, अंधेरी पूर्व मुंबई ४०००९३, मो.क्र. ९०४४९६७९६५ |
| ५ | **मयत** | कु.मानसी रिशी दिक्षीत हि. २१ वर्षे, धंदा. मॉडेलिंग, |

| | | |
|---|---|---|
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | -- |
| ७ | **हस्तगत हत्यार** | नायलॉन रस्सी व डोक्यात लाकडी स्टुल |
| ८ | **आरोपी अटक** | सय्यद मुझमिल हसन सिराजउल हसन वय १९ वर्षे,<br>**अटक दिनांक १५/१०/२०१८ रोजी २१.०० वाजता** |

बांगुर नगर पोलीस ठाणे गु.र.क्र. ३३५/१८, कलम ३०२, २०१ भा.द.वि. या गुन्हयात दिनांक १५/१०/२०१८ रोजीचे १५.४४ वा.चे पुर्वी स्प्रिंग हाईट बिल्डींग समोर, उत्तर वाहिणी रस्त्याच्या कडेला बॅक रोड, माईड स्पेस, मालाड पश्चिम, मुंबई याठिकाणी एका अनोळखी इसमाने एका अनोळखी महिलेस जिवे ठार मारून तीचा मृतदेह ट्रॅव्हल बॅगमध्ये घालून सदरची ट्रॅव्हल बॅग ओला कॅबच्या सहाय्याने माईन्ड स्पेस, मालाड पश्चिम येथे रोडच्या कडेला टाकुन पुरावा नाहीसा करण्याची तजविज केली. म्हणुन बांगुर नगर पो. ठाणे बिनतारी संदेश वाहन क्र.२ यावर कार्यरत असलेले पो.शि.क्र.०९.१६९१/गणेश दिलीप गोसावी वय ३० वर्षे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिलेवरून दिनांक १५/१०/२०१८ रोजी नमुदप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

बांगुर नगर पोलीस ठाणे चे बिनतारी संदेश वाहन क्र.२ वर कार्यरत पोलीस पथकास मुख्य नियंत्रण कक्ष येथुन संदेश प्राप्त झाला की, " बॅक रोड, माईडस्पेस, शुटींग पॉईन्टजवळ, मालाड प. मुंबई येथे एक संशयीत मोठी बॅग बेवारस स्थितीत दिसुन आली असुन त्यास पोलीस मदतीची आवश्यकता आहे." नमुद कॉलप्रमाणे बांगुर नगर पोलीस ठाणे चे बिनतारी संदेश वाहन क्र.२ यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सदर ठिकाणी उपस्थीत असणारे व मुख्य नियंत्रण कक्षास कॉल करणारे साक्षीदार ओला कॅब चालक श्री प्रकाश पांडाप्पा चव्हाण यांच्याकडे सविस्तर चौकशी केली असता, त्यांनी नमुद ठिकाणी उत्तर वाहिनीवर पडलेल्या चॉकलेटी रंगाच्या बॅगकडे अंगुलीनिर्देश करून बॅग दाखविली. व त्यांनी पथकास सांगीतले की, ' सदर बॅग घेवून येणारा इसम त्यांचेच कारमधुन मारूती स्विफ्ट कार क्र.MH02CR 1788 ही मिल्लत नगर, अंधेरी पश्चिम येथुन ओला गाडीच्या टॅबवर संदेश पाठवून बुक केली होती. सदरचा ग्राहक यांस त्यांनी मिल्लत नगर मस्जिद समोरून गाडीत बसविले. सदरवेळी नमुद व्यक्तीकडे नमुद चॉकलेटी रंगाची बॅग असुन सदर बॅग त्याने डिकीमध्ये ठेवण्यास सांगीतले. व त्याने त्यास एअरपोर्ट येथे जावयाचे असल्याचे सांगुन त्याचा मित्र बॅक रोड, माईडस्पेस, शुटींग पॉईन्टजवळ, मालाड प. मुंबई येथे असुन त्याचेसोबत एअरपोर्ट येथे जावयाचे आहे. असे सांगुन नमुद ग्राहकाने गाडी मालाड येथील नमुद पत्त्यावर घेण्यास सांगीतले. त्यानंतर नमुद ठिकाणी आल्यानंतर नमुद ग्राहकाने तेथेच उतरायचे आहे असे सांगुन तो भाडयाचे पैसे देवून सदर बॅगेसह खाली उतरला. त्या ग्राहकाने थोडे अंतर चालत जावून त्याचे ताब्यातील नमुद बॅग बॅक रोड, माईडस्पेस, शुटींग पॉईन्टजवळ, मालाड प. मुंबई येथील उत्तर वाहिनीवर फुटपाथजवळ सोडून घाईघाईने रोडच्या बाजूस जावून रिक्शाने निघून गेला. त्यावेळी नमुद ग्राहकाचा संशय वाटल्याने १०० क्रमांकावर फोन करून पोलीसांना मदतीकरीता बोलवले."

त्यानंतर फिर्यादी यांनी नमुद संशयीत बॅगची पाहणी केली असता, सदरची बॅग संशयीत वाटल्याने त्यांनी मुख्य नियंत्रण कक्षास संदेश देवून पोलीस ठाणे येथुन वरिष्ठ अधिकारी यांना घटनास्थळी बोलावून घेतले. बांगुर नगर पोलीस ठाणे चे पथकाने सदरची बॅगची दोन पंचासमक्ष पाहणी केली असता बॅगमध्ये एक २० ते २५ वयोमान असलेली महिला ही हात व पाय दुमडुन मान खाली घालून बसविलेल्या स्थितीत दिसुन आली. सदर पथकाने लागलीच खाजगी डॉक्टरांना पाचारून करून तिची तपासणी केली असता, नमुद महिला मयत असल्याचे त्यांनी घोषीत केले. सदरबाबत बांगुर नगर पोलीस ठाणे अपमृत्यु नोंद क्र.६२/१८ कलम १७४ फौदंप्रसं, दि. १५/१०/२०१८ अन्वये नोंद घेण्यात आली.

सदर पथकाने घटनास्थंळी बॅग टाकणाऱ्या संशयीत इसमाचे तसेच ज्या मोबाईल क्रमांकावरून नमुद इसमाने ओला बुक केली होती तो मोबाईल क्रमांक ओला कंपनीचे मुख्य ऑफिस यांच्याकडून प्राप्त केला. सदर पथकाने प्राप्त मोबाईल क्रमांकाचे सीडीआर, एसडीआर आणि सध्याचे टॉवर लोकेशन प्राप्त केले असता ते बी/२७,

अल–ओहाद बिल्डींग, मिल्लत नगर, यमुना नगर ओशिवरा, अंधेरी पश्चिम, मुंबई असे आढळून आले. प्राप्त माहितीच्या आधारे दोन विशेष पथके तयार करून त्यांना मिल्लत नगर परिसरात रवाना करण्यात आले. सदर पथकाने मिल्लत नगर परिसरातील अनेक सोसायटी मधील सीसीटीव्हि फुटेजची पाहणी केली असता, अल–ओहाद बिल्डींगच्या सीसीटीव्हि फुटेजमध्ये एक तरूण मुलगा चॉकलेटी रंगाची मोठी बॅग घेवून जात असल्याचे दिसून आले. त्यावरून संशयीत तरूण मुलाची ओळख पटवून नमुद परिसरात पथकाने सापळा लावला. सदर पथकास नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपीत नामे सय्यद मुझमिल हसन सिराजउल हसन वय १९ वर्षे हा मिल्लत नगर परिसरात मिळून आला. सदर पथकाने त्यास शिताफीने ताब्यात घेवून त्याच्याकडे सदर गुन्हयाच्या अनुषंगाने कसुन कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यानेच नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. नमुद आरोपी सय्यद मुझमिल हसन सिराजउल हसन वय १९ वर्षे याचा गुन्हयातील सक्रीय सहभाग निष्पन्न झालेवरून त्यास दिनांक १५/१०/२०१८ रोजी २१.०० वा. नमुद गुन्हयात रितसर अटक करण्यात आले.

सदर पथकाने अटक आरोपीताकडे नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने कसुन सखोल चौकशी करता, आरोपीत इसमाने मयत महिला मानसी रिशी दिक्षीत हिस फोटो काढण्याच्या बहाण्याने राहत्या घरी बोलावले व तिच्याकडे शरीर सुखाची मागणी केली. परंतु मानसी दिक्षीत हिने आरोपीच्या मागणीस स्पष्ट शब्दात नकार दिल्याने त्याचा राग आल्याने आरोपीने राहत्या घरातील नायलॉनच्या रस्सीने मानसीचा गळा आवळला व तिला लाकडी स्टूलने डोक्यात मारहाण केली. त्यानंतर तिचा मृतदेह चॉकलेटी रंगाच्या बॅगमध्ये कोंबून ओला कॅबद्वारे बॅक रोड, माईडस्पेस, शुटींग पॉईन्टजवळ, मालाड प. मुंबई येथे टाकले. सदर पथकाने अटक आरोपीताकडुन गुन्हयात वापरलेली नायलॉनची रस्सी व लाकडी स्टूल सविस्तर पंचनाम्यान्वये हस्तगत केले.

बांगुर नगर पोलीस ठाणेचे पथकाने मानवी कौशल्य व तांत्रिक तपासाचे आधारे फोटो शुट करण्याच्या बहाण्याने बळीत मुलीस घरी बोलावून तिचेकडे शरीरसुखाची मागणीचा नकार दिल्याचा राग मनात धरून नमुद महिलेचा नायलॉनच्या रस्सीने गळा आवळून व लाकडी स्टूलने डोक्यात मारहाण करून निर्घुण खुन करण्याच्या आरोपीस फक्त ६ तासाचे आत आत अटक करून नमुद गंभीर गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना **ऑक्टोबर–२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**बांगुर नगर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे | अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय नारायण बाणे | ०६ | पो.ह.क्र. २७५०८/राजु मारूती जाधव |
| ०२ | पोलीस निरीक्षक अरविंद प्रल्हाद चंदनशिवे | ०७ | पो.ह.क्र. ३१८६०/उमेश राजाराम देसाई |
| ०३ | सहा पोलीस निरीक्षक विनीत दिलीप कदम | ०८ | पो.ना.क्र. ९७०७२२/संतोष मधुकर देसाई |
| ०४ | सहा पोलीस निरीक्षक दिलीप बबन काळे | ०९ | पो.ना.क्र. ००७३३/विनोद मधुकर शेलार, |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक राजेद्र दादासाहेब तोरडमल | १० | पो.ना.क्र. १४५४०/अभय दत्ताराम जाधव |

--- 000 ---